MHCO170002602024

दाखल ता. ०१/०८/२०२४
निकाल ता. ०६/०८/२०२६
कालावधी ०२ वर्षे ०० महिने ०५ दिवस

सहकारी न्यायालय कोपरगांव जिल्हा. अहमदनगर यांचे न्यायालयात

(पीठासीन अधिकारी आर. एन. दांडगे)

ल. मु. नं. २५७/२०२४ नि. ५१

कै. गेणुजी रखमाजी डेरे पाटील
ग्रामीण बिगरशेती सह. पत. मर्या.
गुंजाळवाडी तर्फे व करीता मॅनेजर
श्री. भाऊसाहेब मुरलीधर जगताप
वय: ५२ वर्षे, धंदा : नोकरी
रा. संजिवन हॉस्पिटल जवळ, गुंजाळवाडी,
ता. संगमनेर जि. अ. नगर .... **वादी**

विरुध्द

१) **हिराबाई ज्ञानेश्वर पुंड**
वय: ५७ वर्षे, धंदा: –

२) **खंडेराव ज्ञानेश्वर पुंड**
वय: ३७, धंदा: –

३) **रामनाथ विठ्ठल डोके**
वय:६१, धंदा: –
प्र.वादी क्र.०१, २ रा. गणेशनगर, संगमनेर,
ता. संगमनेर, जि. अहमदनगर
प्र.वादी क्र.०३ कासार हॉस्पीटल व देवीच्या मंदीराजवळ
बायपास रोड, संगमनेर ता. संगमनेर, जि.अ.नगर .... **प्रतिवादी**

विवाद : रक्कम रुपये १०,०२,६१४/– वसुलीसाठी.

वादीतर्फे वकील : ॲड. श्री. एन. पी. काळे
प्र.वादी नं .१ : ॲड. श्री. वी. जे. कांगणे
प्र.वादी क्र. २ व ३ : एकतर्फा

न्यायनिर्णय

(दिनांक ०६/०८/२०२६ रोजी घोषित करण्यात आला)

प्रस्तुत दावा कर्जाची थकबाकी त्यावरील व्याज व खर्च वसूल होऊन मिळण्यासाठी आहे.

वादातील थोडक्यात कथन :-

१. वादी ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व नियमांनुसार नोंदणीकृत असलेली सहकारी पतसंस्था असून, तिचा व्यवसाय ठेवी स्वीकारणे आणि आपल्या गरजू सभासदांना कर्ज देणे हा आहे. पुढे असे नमूद केले आहे की, प्रस्तुत दावा दाखल करण्याचा अधिकार वादी संस्थेने तिचे मॅनेजर श्री. भाऊसाहेब मुरलीधर जगताप यांना ठरावाने दिला आहे.

२. वादी पुढे असे कथन करीत आहे की, प्रतिवादी क्र ०१ ते ०३ हे वादी संस्थेचे सभासद आहेत. प्रतिवादी क्र.१ यांनी वादी संस्थेकडे कर्जाची मागणी केली त्या अन्वये वादी संस्थेने प्रतिवादी क्र.१ यांस तिच्या संचालक मंडळ सभा दि. १०/१२/२०१२ मध्ये ठराव क्र.३ ने रक्कम रु. २,००,०००/- चे कर्ज मंजुर केले. सदरील कर्जास प्रतिवादी क्र.२ व ३ जामीनदार म्हणुन राहण्याचे कबुल केले. पुढे या प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दि. ०५/०२/२०१३ रोजी वादी संस्थेच्या हक्कात वचनचिठ्ठी, कर्जरोखा, जामीनरोखा इ. कर्ज कागदपत्र करुन दिली व वादी संस्थेने प्रतिवादी क्र.१ यांस कर्ज रक्कम वितरीत केली. सदरील कर्जकागदपत्र करुन देऊन प्रतिवादी क्र.१ यांनी सदरील कर्ज १५% व्याज दराने दि. ०५/०२/२०१६ पर्यंत हफ्त्याने परतफेड करण्याचे कबुल केले. पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी कर्जाचे हफ्ते थकित झाल्यास २% दंडव्याज देण्याचे मान्य केले होते.

३. पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी १ यांनी सदरील कर्ज रक्कम उचल केल्यानंतर कर्जाच्या अटी-शर्ती प्रमाणे परतफेड करण्याचे होते, परंतु प्रवितादी क्र.१ यांनी कर्जाचे हफ्ते नियमित परतफेड केले नाही व कर्ज थकित ठेवले. पुढे असे कथन आहे की,

कर्ज थकित झाले म्हणुन वादी संस्थेने दि. ०६/०५/२०२४ रोजी वकिलांमार्फत प्रतिवादींना नोटिस पाठविल्या परंतु नोटिस मिळुनही प्रतिवादी यांनी कर्जाची थकित रक्कम भरली नाही.

४. पुढे असे कथन आहे की, वादी संथेने प्रतिवादी क्र.१ च्या नावे कर्ज खाते ठेवले आहे व त्या कर्जखात्यात झाल्या व्यवहाराच्या तसेच त्रैमासिक व्याजाच्या नोंदी घेतल्या आहेत. वादी यांचे असे कथन आहे की, या खातेउतारऱ्याप्रमाणे दि. ३०/०६/२०२४ अखेर प्रतिवादींकडुन रक्कम रु. १०,०२,६१४/– येणे बाकी आहे. पुढे असे कथन आहे की, वादी संस्थेने प्रतिवादी यांना वारंवार थकित रक्कम भरण्याची विनंती केली तसेच नोटिस दिल्या, परंतु प्रतिवादी यांनी थकित रक्कम भरण्यास टाळाटाळ केली, म्हणुन वादी संस्थेस प्रस्तुत दावा दाखल करणे भाग पडला आहे. तेव्हा वादी यांची अशी विनती की, कर्जाची येणे रक्कम पुढील व्याज १७% प्रमाणे प्रतिवादींकडून वैयक्तिक व संयुक्तिरित्या वसुल होऊन मिळावी.

५. प्रतिवादी यांना दाव्याचे समन्स काढण्यात आले. समन्स बजावणीच्या अनुषंगाने प्रतिवादी क्र.१ वकिलांमार्फत दाव्यात हजर झाले व त्यांनी आपली कैफियत निशाणी १४ वर सादर केली. प्रतिवादी क्र.२ व ३ यांना निशाणी ०७ व निशणी–२५ द्वारे समन्सची बजावणी होऊनही दाव्यात हजर झाले नाही, म्हणुन त्यांच्या विरुध्द दावा एकतर्फा चालविण्याचा हुकुम दि. १०/१२/२०२४ रोजी पारीत करण्यात आला.

६. प्रतिवादी क्र.१ यांनी आपल्या कैफियतीद्वारे असे कथन केले आहे की, वादी यांच्या दाव्यातील संपुर्ण मजकुर खोटा व बनावट असुन बेकायदेशीर आहे. पुढे असे कथन आहे की, वादीचा दावा वस्तुस्थितीला धरुन नाही व बेकायदेशीर आहे.

७. पुढे असे कथन आहे की, दावा परीच्छेद क्र.२ व ३ मधील मजकुर खोटा, बनावट व वस्तुस्थितीला धरुन नाही, म्हणुन वादी यांचा दावा रद्द करण्यात यावा.

८. वादी यांना दावा दाखल करण्यास कोणतेही संयुक्तिक व कायदेशीर कारण घडले नाही म्हणुन या कारणास्तव वादीचा दावा रद्द करण्यात यावा.

९. पुढे असे कथन आहे की, वादी यांना दाव्यातील दाद मागण्याचा कायद्याने अधिकार नाही. प्रतिवादी क्र.१ चे असे आरोप आहे की, वादी यांनी कर्ज खात्यात

व्याजाची चुकीची आकारणी करुन सावकारी पद्धतीने व्याज लावले आहे.

१०. पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ ही अशिक्षित स्त्री आहे. प्रतिवादी क्र.१ यांना दिलेले कर्ज हे शेती स्वरुपाचे आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे शेतीसाठी दिलेल्या कर्जाला ७ ते ८ % व्याजदर आहे. परंतु वादी संस्थेने प्रतिवादी क्र.१ यांचा अशिक्षित पणाचा गैरफायदा घेऊन चुकीचे व बेकायदेशीर व्याज लावलेला आहे. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, सद्याचे प्रचलित व्याजदर हा ११% टक्के आहे म्हणुन त्याच्या कर्जखात्यात लावलेला व्याज चुकीचा व बेकायदेशीर आहे.

११. पुढे असे कथन आहे की, वादी यांचा दावा मुदतीत दाखल केलेला नाही. कर्जाची मुदत तीन वर्षाची होती, परंतु वादी संस्थेने प्रतिवादी यांचा कर्जखाते बेकायदेशीरपणे चालु ठेवुन प्रस्तुतचा मुदत बाह्य दावा दाखल केला आहे. कर्जाचे कागदपत्र बघता कर्जफेडीच्या मुदतीमध्ये विसंगती दिसुन येत आहे. सदरची विसंगती प्रतिवादीकडुन ज्यादाचे पैसे वसुल करण्यासाठी केल्याची दिसुन येत आहे. वादी यांनी दाखल केलेला खातेउतारा पाहता प्रतिवादी क्र.१ यांनी कोणतीही रक्कम भरली नाही असे दिसुन येते तरीसुध्दा वादी संस्थेने मे २०२४ पर्यंम कुठलीही वसुलीची कारवाई केली नाही. तेव्हा असे आरोप आहे की, वादी हा रॉन्ग डोअर आहे. या प्रतिवादीचे असे कथन आहे की, वादी यांना प्रसतुत कर्जाची येणे दाम दुप्पट प्रमाणे व्याजाची आकारणी करुन करावी.

१२. पुढे असे कथन आहे की, वादीच्या प्रमाणे जरी व्याजदर १५% धरला असता वर्षाला ३०,०००/– चे व्याज होते, परंतु वादी यांनी चक्रवाढ प्रमाणे व्याजाची आकारणी केलेली दिसुन येते. तेव्हा वादी यांनी या दाव्या द्वारे अवास्तव रक्कम प्रतिवादींकडून वसुल करण्याचा प्रयत्न करीत आहे. या प्रतिवादीचे असे कथन आहे की, शासनाच्या नियमाप्रमाणे वादी यांना दामदुप्पटीपेक्षा जास्त व्याज आकारण्याचे कायद्याने अधिकार नाही.

१३. पुढे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र.१ ही स्त्री असुन तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ ही दाव्यातील येणे रक्कम परतफेड करण्याची कुवत नाही. पुढे अशी विनंती आहे की, वादी यांनी कर्जाला ७ ते ८ % प्रमाणे

व्याजदर लावुन आकारणी करणे आवश्यक होते परंतु चुकीच्या पद्धतीने व्याजाची आकारणी करुन खोट्या रकमाचा दावा आणला आहे, म्हणुन हे प्रतिवादी अशी विनंती करीत आहे की, वादी यांचा दावा रद्द करण्यात यावा.

१४. या परस्परविरोधी कथनाच्या अनुषंगाने, मी निशानी–२७ वर मुद्दे गठीत केले आहे. पुढे सदर मुद्दयांना मी माझे कारणमिमांसा देऊन खालील प्रमाणे उत्तर देत आहे.

अनु. क्र.	मुद्दे	कारणमिमांसा
१.	दाव्यातील कर्जाला १५% व्याजदर ठरला होता. असे वादी सिध्द करतात का ?	होकारार्थी
२.	कर्जखात्यात वादीने ज्यादा व अवास्तव व्याजाची आकारणी केली आहे असे प्रतिवादी क्र.१ सिध्द करतात का ?	नकारार्थी
३.	प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्याकडून रक्कम रु. १०,०२,६१४/– येणे आहेत व ते प्रतिवादी १ ते ३ यांच्याकडून वैयक्तिक व संयुक्तिकरित्या मागणी केल्या प्रमाणे पुढील व्याजासह वसुल करण्यास पात्र आहे असे वादी सिध्द करतात का ?	होकारार्थी
४.	वादातील कर्जाला दाम दुप्पट नियमाप्रमाणे व्याजाची आकारणी करण्यात यावी असे प्रतिवादी क्र.१ सिध्द करतात का ?	नकारार्थी
५.	काय आदेश व निवाडा	अंतिम आदेशाप्रमाणे

कारणे

१५. वादी संस्थेने आपला दावा सिद्ध करण्यासाठी, तिचे अधिकृत इसम श्री. सुनिल भास्कर लवारे यांची साक्ष लेखी जबानी द्वारे निशाणी २८ वर सादर केली. ह्या वादी साक्षीदार यांनी निशाणी ३१ ते ४० वर दस्तऐवजी पुरावा सादर केला. पुढे वादी यांनी साक्षीदार म्हणुन तिचे रोखपाल श्री. पुंजीराम भिमाशंकर हिरे यांची साक्ष प्रतिज्ञापत्राद्वारे निशाणी ४५ वर दिली आहे. या साक्षीदाराने भारतीय साक्ष अधिनियम चे प्रमाणपत्र निशाणी ४८ वर दाखल केले आहे. वादी संस्थेने निशाणी ४९ वर पुरशिस सादर करुन तिचा पुरावा बंद केला आहे. प्रतिवादी क्र.१ यांना संधी देऊनही तोंडी अथवा लेखी पुरावा सादर केला नाही, म्हणुन प्रतिवादी क्र.१ चा पुराव्याचा हक्क रद्द करण्याचा आदेश दि.

१९/०७/२०२६ रोजी पारीत करण्यात आला. वादी तर्फे विद्वान वकिल श्री. एन. पी. काळे यांचा अंतिम युक्तिवादा ऐकला तसेच प्रतिवादी क्र.१ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. वी. जे. कांगणे यांचा अंतिम युक्तिवाद ऐकला. तसेच प्रतिवादी क्र.१ यांनी निशाणी ५० वर दाखल केलेले लेखी युक्तिवाद वाचला. दाव्यात आलेल्या तोंडी व लेखी पुराव्याची पडताळणी करुन तसेच दोन्ही वकिलांचे युक्तिवाद ऐकुन मी उपरोक्त मुद्यांना कारणमिमांसा देऊन खालील प्रमाणे उत्तर देत आहे.

<u>मुद्दा क्र. ०१ व ०२ :–</u>

१६. प्रतिवादी क्र.०१ यांनी तिच्या कैफियतीद्वारे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.०१ यांना शेती स्वरुपाचे कर्ज दिलेले आहे. शासनाच्या नियमाप्रमाणे शेतीसाठीच्या कर्जाला ७ ते ८ टक्के इतकेच व्याज दर आहे. प्रतिवादी क्र.०१ ही अशिक्षित आहे व वादी यांनी ज्यादा व्याज लावले आहे. व्याज मध्ये वेळोवेळी होणार बदल हे वादी व प्रतिवादी यांनी मान्य केले होते व आज मितीस कर्जाला व्याजदर ११% आहे, परंतु खातेउतारात या बदललेल्या व्याजदराने व्याजाची आकारणी केल्याची दिसुन येत नाही.

१७. पुढे प्रतिवादी क्र.०१ याचे असे आरोप आहे की, वादी संस्थेने प्रतिवादी क्र.०१ च्या कर्जाला चुकीचे व्याजाची आकारणी केली आहे. वादी ने सावकारी पद्धतीने व्याज आकारणी केली आहे. तसेच चक्रवाढ प्रमाणे व्याजाची आकारणी केली आहे. तेव्हा वादी यांनी ज्यादा व अवास्तव व्याजाची आकारणी करुन प्रतिवादी कडुन ज्यादा रक्कम वसुल करण्याचा प्रयत्नात आहे.

१८. या कथनाचा व आरोपाचा अनुषंगाने मी वादी साक्षीदार क्र.०१ यांची तोंडी साक्षीचे निरीक्षण केले. वादी साक्षीदार क्र.०१ यांचा साक्षीत असे आले आहे की, प्रतिवादी क्र.०१ चा मागणीवरुन वादी संस्थेने दि. १०/१२/२०१२ रोजी संचालक मंडळाचा ठराव क्र.०३ अन्वये रक्कम रु. २,००,०००/– चे कर्ज मंजुर केले. या कर्जास प्रतिवादी क्र. ०२ व ०३ जामिनदार राहिले. या प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दि. ०५/०३/२०१३ रोजी वचनचिठ्ठी, कर्जरोखा, जामिनरोखा इत्यादी कर्जकागदपत्र करुन दिली व वादी संस्थेने प्रतिवादी क्र.०१ यास कर्ज रक्कम वितरीत केली. पुढे या प्रतिवादी यांनी सदर कर्ज १५% व्याज दराने तिमाही हफ्त्याने दि. ०५/०२/२०१६ पर्यंत

परतफेड करण्याचे मान्य केले. पुढे अशी साक्ष आहे की, प्रतिवादी क्र.०१ यांनी कर्ज रक्कम ची उचल करुन उपभोग घेतला परंतु कर्जरक्कम कर्जाच्या अटी–शर्ती प्रमाणे परतफेड केली नाही.

१९. वादी साक्षीदार यांनी त्याच्या या तोंडी पुराव्याच्या पृष्ठ्यार्थ लेखी पुरावा निशाणी ३१ ते ४० दाखल करुन अवलंबुन राहिले आहेत. या लेखी पुराव्याची पडताळणी केली असता, निशाणी ३१ वर वादी संस्थेचा दि. २१/०६/२०२४ रोजीच्या संचालक मंडळ सभेतील ठराव क्र. ०५ ची सत्यप्रत आहे. सदरील ठरावाद्वारे थकित कर्जदार विरुध्द दावे दाखल करण्याचा अधिकार या साक्षीदारास दिला असल्याचे दिसुन येत आहे. पुढे निशाणी ३२ वर प्रतिवादी क्र.०१ याचा कर्ज मागणी अर्ज आहे. या कर्जमागणी अर्जाची पडताळणी केली असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.०१ यांनी रक्कम रु. २,५०,०००/– च्या कर्जाची मागणी लॉन्स दुरुस्तीसाठी केली आहे. या कर्जमागणी अर्जावर प्रतिवादी क्र. ०२ व ०३ जामीनदार राहिल्याचे दिसुन येतात व प्रतिवादी क्र. ०१ ते ०३ यांच्या या अर्जावर सह्या आहेत. पुढे या अर्जाचा शेवटी कर्ज मंजुरीचा शेरा जे हे दर्शवितो की प्रतिवादी क्र.०१ यास दि. १०/१२/२०१२ रोजीच्या संचालक मंडळ मिटींग मध्ये ठराव क्र. ०३ ने रक्कम रु. २,००,०००/– मंजुर करण्यात आले आहेत. या कर्ज मंजुरी शेराला मॅनेजर व चेअरमन यांच्या सह्या आहेत.

२०. पुढे कागदपत्राची पडताळणी केली असता निशाणी –३३ हे प्रतिवादी क्र.०१ यांनी नियम ४५(१) अन्वये करुन दिलेले प्रतिज्ञापत्रक आहे, निशाणी ३४ वर प्रतिवादी क्र.०१ यांनी करुन दिलेले कर्जरोखा आहे. या कर्जरोखा वरुन प्रतिवादी क्र.०१ यांनी रक्कम रु. २,००,०००/– चे कर्ज घेतल्याचे व ते रु. ६,५००/– चा त्रैमासिक हफ्त्याने परतफेड करण्याचे मान्य केले आहे. सदरील कर्जाला व्याजदर १५% असल्याचा दिसुन येत आहे. या कर्जरोखा वर प्रतिवादी क्र. ०१ यांची सही आहे.

२१.पुढे या कर्जरोखा चा पाठीमागे प्रतिवादी क्र.०२ व ०३ यांनी कर्जाला करुन दिलेला जामीननामा आहे व प्रतिवादी क्र.०२ व ०३ यांनी कर्जाची जामीन घेतल्याचा दर्शवितो. त्यावर प्रवितादी क्र.०२ व ०३ यांचा सह्या आहेत. पुढे निशाणी–३५ ही वचनचिठ्ठी आहे. प्रतिवादी क्र. ०१ ते ०३ यांनी सदर वचनचिठ्ठी करुन दिल्याचे दर्शविते

व सदर कर्ज १५% व्याज दराने परतफेड करण्याचे मान्य केल्याचे दिसुन येते.

२२. आता या कागदपत्राची पडताळणी केली असता हे स्पष्ट होत आहे की, प्रतिवादी क्र.०१ यांनी वादी संस्थेकडून रक्कम रु. २,००,०००/– चे कर्ज घेतले आहे व सदर कर्ज १५% व्याज दराने त्रैमासिक हफ्त्याने परतफेड करण्याचे मान्य केले आहे. तेव्हा या तोंडी व लेखी पुराव्यावरुन हे स्पष्ट होत आहे की कर्जाला व्याज दर हा १५% द. शा. द. शे त्रैमासिक पद्धतीने देण्याचा ठरला होता.

२३. प्रतिवादी यांचा आरोप आहे की, प्रतिवादी क्र.०१ ही अशिक्षीत आहे. प्रतिवादी क्र.०१ ला शेती स्वरुपाचे कर्ज दिले आहे व शेती स्वरुपाचा कर्जाला शासन नियमाप्रमाणे ७ ते ८ टक्के व्याज दर आहे. वादी संस्थेने प्रतिवादी क्र.०१ याचा अशिक्षीतपणाचा फायदा घेऊन कर्ज कागदपत्रावर १५% व्याज दर लिहिला आहे. सर्व प्रथम प्रतिवादी क्र. ०१ यांनी जे कर्ज घेतले आहे ते शती कर्ज आहे हे सिध्द करणे आवश्यक होते. प्रतिवादी क्र.०१ यांनी या संदर्भात कोणताही पुरावा देऊन ही बाब सिध्द केली नाही. या उलट प्रतिवादी क्र.०१ यांचा कर्जमागणी अर्ज निशाणी ३२ ची पडताळणी केली असता, हे स्पष्ट दिसुन येते की, प्रतिवादी क्र. ०१ यांनी कर्ज रक्कम रु. २,००,०००/– ची मागणी लॉन्स दुरुस्ती करीता केली आहे. तेव्हा हे कर्ज शेती स्वरुपाचे नसुन ते व्यावसायिक स्वरुपाचे आहे. वादी साक्षीदाराचा उलटतपासणीत असे आले आहे की, प्रतिवादी क्र.०१ याचा मंगलकार्यालयाचा व्यवसाय आहे. तेव्हा लॉन्स दुरुस्ती करीता घेतलेले कर्ज म्हणजे प्रतिवादी क्र.०१ यांनी त्यांचा या मंगलकार्यालयाचा दुरुस्तीकरीता कर्ज घेतल्याचे स्पष्ट होते. तेव्हा या तोंडी व लेखी पुराव्यावरुन हे स्पष्ट होत आहे की, प्रतिवादी क्र.०१ यांनी घेतलेले कर्ज हे व्यवसायिक कर्ज आहे आणि त्याला व्याज दर हा १५% ठरला होता.

२४. आता प्रतिवादी क्र. ०१ याचे आरोप आहे की, वादी संस्थेने कर्जाला ज्यादा व्याज दर लावुन खोटी येणे बाकी दाखवली आहे व प्रवितादी कडून बेकायदेशीर रक्कम वसुल करु पाहत आहे. प्रतिवादी वकिलांचा असा युक्तिवाद आहे की, कर्जाला ७–८ % व्याजदर ठरला होता. प्रतिवादी ही अशिक्षीत आहे व वादी संस्थेने प्रतिवादी क्र.०१ याचा कर्ज कागदपत्रावर सह्या घेऊन नंतर त्यावर १५% व्याजदर लिहिला आहे. त्याचा असा

युक्तिवाद आहे की, कर्जाला व्याजदर १५% ठरला नव्हता. पुढे असा युक्तिवाद आहे की, शासन नियमाप्रमाणे कर्जाचा व्याज दर हा बदलत असतो व तो आज मितीस ११% आहे. त्यांनी असा युक्तिवाद केला आहे की, वादी साक्षीदार यांनी त्याचा उलटतपासाम मान्य केले आहे की, व्याजदरात वेळोवळी बदल होत असतो. परंतु वादी यांनी कर्ज खात्यात व्याज दरात बदल झाल्याप्रमाणे व्याजाची आकारणी केली नाही. तेव्हा त्याचा आरोप आहे की, वादी संस्थेने ज्यादा दराने व्याज आकारले आहे.

२५. या कथनाचा व युक्तिवादाचा विचार करता व तोंडी व लेखी पुरावा पडताळुन पाहिला असता, असे दिसुन येते की कर्जाच्या कराराप्रमाणे कर्जाला व्याज दर हा १५% ठरला आहे. निशाणी ३४ कर्जरोखा व निशाणी ३५ वचनचिठ्ठी हे स्पष्ट दर्शवितात की कर्जाला व्याजदर हा १५% ठरला आहे. वादी साक्षीदाराचा उलटतपासात असे आले आहे की, कर्जखात्यात व्याज दर हा १५% व नंतर १४% प्रमाणे आकारणी केली आहे. तेव्हा कर्जाला ज्यादा व्याज दर आकारला आहे हे स्पष्ट होत नाही. प्रतिवादी क्र.०१ यांनी या संदर्भात वादी साक्षीदाराचा अथवा लेखी पुरावा खोडुन काढला नाही. तसेच प्रतिवादी यांनी खातेउताऱ्यातील नोंदी ह्या ज्यादा व्याजदराने आकारले आहे हे सिध्द केले नाही. या उपरोक्त प्रतिवादी क्र.०१ यांनी हे सिध्द केले नाही की, कर्जाला व्याज दर १५% ठरला नव्हता व तो ७–८% होता. तेव्हा मी या तोंडी व लेखी पुराव्यावरुन या निष्कर्षास येत आहे की, वादी यांनी कर्जाला १५% व्याजदर ठरला होता हे सिध्द केले आहे व प्रतिवादी क्र.०१ वादी संस्थेने कर्जाला जाद व्याज लावले आहे हे सिध्द करु शकले नाही. तेव्हा मुद्दा क्र. ०१ यास माझे उत्तर होकारार्थी आहे व मुद्दा ०२ यास नकारार्थी आहे.

<u>मुद्दा क्र.०३:–</u>

२६. वादी साक्षीदार क्र.०१ यांचा तोंडी पुरावा तपासुन पाहिला असता असे दिसुन येते की, प्रतिवादी क्र.०१ यांनी वादी संस्थेकडुन रक्क्म रु. २,००,०००/– चे कर्ज दि. ०५/०२/२०१३ रोजी घेतले असुन त्या कर्जास प्रतिवादी क्र.०२ व ०३ जामीनदार राहिले आहे. सदर कर्जाला इत्यादी कागदपत्रे दि. ०५/०२/२०१३ रोजी लिहुन दिली व सदर कर्ज १५% त्रैमासिक व्याज दराने दि. ०५/०२/२०१६ अखेर परतफेड करण्याचे मान्य केले. पुढे अशी साक्ष आहे की, प्रतिवादी क्र.०१ यांनी दि.०५/१२/२०१३ रोजी

कर्ज रक्कम उचल करुन तिचा उपभोग घेतला. प्रतिवादी क्र.०१ यांनी कर्जाची परतफेड कर्जाचा अटी–शर्ती प्रमाणे करण्याचे होते, परंतु प्रतिवादी क्र.०१ यांनी कर्जाची परतफेड अटी–शर्ती प्रमाणे केली नाही.

२७. पुढे अशी साक्ष आहे की, वादी संस्थेने प्रतिवादी क्र.०१ यांचा नावे कर्ज खाते ठेवले आहे. त्या कर्जखात्यात कर्जरक्कम व त्यावर होणारे व्याज यांच्या नोंदी घेतल्या आहे. प्रतिवादी यांनी कर्जखाते थकित ठेवले म्हणुन वादी संस्थेने दि.०६/०५/२०२४ रोजी प्रतिवादी यांना वकिलांमार्फत नोटिस पाठवल्या, परंतु नोटिस मिळुनही प्रतिवादी यांनी थकित रक्कम भरली नाही. पुढे अशी साक्ष आहे की, वादी संस्थेने ठेवलेल्या कर्ज खात्याप्रमाणे प्रतिवादी यांच्याकडे दि.३०/०६/२०२४ अखेर रक्कम रु. १०,०२,६१४/– येणे बोकी आहे. वादी साक्षीदाराने कर्ज खाते उताराची प्रत निशाणी–३६ वर दाखल केला असुन त्यावर येणे रकमेसाठी अवलंबुन आहेत.

२८. वादी साक्षीदार क्र.०२ यांची तोंडी साक्ष तपासुन पाहिली असता असे दिसुन येते की, हे साक्षीदार वादी संस्थेत सन–२००१ पासुन रोखपाल म्हणुन काम करीत आहेत. त्यांना वादातील कर्जाची माहिती आहे. पुढे अशी साक्ष आहे की, प्रतिवादी क्र.०१ यांनी वादी संस्थेकडून रक्कम रु. २,००,०००/– चे कर्ज घेतले आहे. त्या कर्जास प्रतिवादी क्र.०२ व ०३ जामीनदार राहिले आहे. या प्रतिवादींनी या कर्जासाठी आवश्यक कर्ज कगदपत्र करुन दिली व त्या कर्ज कागदपत्रातील प्रतिवादी यांच्या सह्या तो ओळखतो असे म्हटले आहे.

२९. पुढे अशी साक्ष आहे की, प्रतिवादी क्र.०१ यांच्या संगणकीकृत कर्ज खातेउतारा दाखल केला आहे व त्यातील नोंदी खऱ्या व बरोबर आहे. या खातेउतारा नोंदीसाठी भारतीय साक्ष अधिनियमाप्रमाणे प्रमाणपत्र दाखल केले असुन त्या प्रमाणपत्रावर माझी सही आहे. हे साक्षीदार निशाणी–४८ वर हे प्रमाणपत्र दाखल करुन त्यावर अवलंबुन आहेत.

३०. या तोंडी पुराव्यावरुन मी या साक्षीदाराने दाखल केलेले नि–३६ व ४८ वर दाखल केलेला खातेउतारा व प्रमाणपत्र पडताळुन पाहिले आहे. खातेउतारा निशाणी–३६ हा दि. १५/०२/२०१३ ते ३०/०६/२०२४ या कालावधीचा आहे.

दि.१५/०२/२०१३ रोजी रक्कम रु. २,००,०००/– नावे टाकल्याची नोंद आहे. पुढे खातेउतारात त्रैमासिक व्याज रक्कमेची नोंदी घेतल्याची दिसुन येत आहे. जमा बाजु मध्ये एकही हफ्ता भरल्याचा दिसुन येत नाही व दि. ३०/०६/२०२४ अखेर रक्कम रु. १०,०२,६१४/– थकित असल्याचे दिसुन येत आहे. पुढे निशाणी–४८ वर भारतीय साक्ष अधिनियम कलम ६३(४)(क) प्रमाणे दिलेले प्रमाणपत्र आहे. हे प्रमाणपत्र वादी साक्षीदार क्र.२ यांच्या सहीने दिलेले आहे जे हे दर्शविते की संगणकीकृत खातेउताऱ्यातील नोंदी ह्या खऱ्या व बरोबर आहेत.

३१. प्रतिवादी क्र.०१ यांनी येणे रक्कम नाकारली आहे. प्रतिवादी क्र.०१ यांचे कथन व युक्तिवाद लक्षात घेता असे आरोप आहे की, वादी संस्थेने ज्यादा दराने व्याज लावले आहे व व्याज हे सावकारी व चक्रवाढ प्रमाणे आकारले आहे. प्रतिवादी क्र.०१ यांनी ज्यादा व्याज आकारण्यात आले आहे ही बाब सिध्द करण्यासाठी कोणताही तोंडी व लेखी पुरावा आणला नाही. तसेच त्यांनी वादी साक्षीदाराचा तोंडी पुरावा खोडुन काढला नाही. खातेउतारा नि–३६ मधील नोंदी खोडुन काढल्या नाही अथवा हे सिध्द केले नाही की खातेउताऱ्यात ज्यादा दराने व्याज लावुन नोंदी घेतल्या आहे.

३२. प्रतिवादी क्र.०१ यांचा विद्वान वकिलांचा युक्तिवाद आहे की, वादी यांनी खातेउतारात काही ठिकाणी १४% तर काही ठिकाणी १५% व्याजाची आकारणी केली आहे. त्याचे असे म्हणणे आहे की, कर्ज खात्यात कर्ज रकमेच्या पाचपट व्याज आकारले आहे. तसेच असे युक्तिवाद आहे की, व्याज चक्रवाढ प्रमाणे आकारले आहे. तेव्हा खाते उताऱ्यात दाखविलेली येणे रक्कम ही खोटी व बेकायदेशीर आहे. पुढे असाही युक्तिवाद आहे की, वादी साक्षीदार क्र.०१ यांनी उलटतपासात मान्य केले आहे की, खातेउतारा बरोबर नाही, त्याला भारतीय साक्ष अधिनियमानुसार प्रमाणपत्र नाही. तेव्हा खातेउतारा नि–३६ हा बरोबर नाही व येणे बाकी ही खोटी व बेकायदेशीर आहे.

३३. या अनुषंगाने खाते उतारा नि–३६ ची पडताळणी केली असता असे दिसुन येते की, खातेउताऱ्यात १४% त्रैमासिक व्याज दराने आकारणी केली आहे. कर्जरोखा व वचनचिठ्ठी नि–३४ व ३५ हे दर्शवितात की व्याजदर १५% आहे. वादी साक्षीदार क्र.०१ आपल्या उलटतपासात ॲडमिट करतात की, खातेउताऱ्यात व्याजाची आकारणी १४%

प्रमाणे केली आहे. याउलट खातेउताऱ्यात अधिक व्याज किंवा दंड व्याज आकारणी केल्याची दिसुन येत नाही. या सर्व पुराव्या वरुन माझे असे मत आहे की, जेव्हा कर्जाचा करार हा व्याजदर १५% आहे असे सांगतो व खातेउताऱ्यात आकारणी १४% केली आहे तेव्हा प्रतिवादी क्र.०१ याचे म्हणणे की वादी संस्थेने जयादा व्याजाची आकारणी केली आहे हे संयुक्तिक नाही. प्रतिवादी यांनी व्याजदर १५% ठरला नव्हता हे सिध्द केले नाही, अथवा ज्यादा व्याज दर लावुन खातेउतऱ्यात आकारणी केली आहे हे सिध्द केले नाही. या संदर्भात प्रतिवादी क्र.०१ यांनी कोणताही तोंडी अथवा लेखी पुरावा दिला नाही. ज्यादा व्याजदर लावुन आकारणी केली आहे व खोटी येणे बाकी दाखविली आहे हे नुसते कथन करुन बाब सिध्द होत नाही तर ती बाब पुरावा देऊन सिध्द करणे आवश्यक आहे. तेव्हा वादी यांचा तोंडी व लेखी पुराव्यावरुन मी या निष्कर्षास येत आहे की, वादी यांनी त्यांची दाव्यातील मागणी रक्कम रु. १०,०२,६१४/– सिध्द केली आहे.

३४. पुढे कर्ज कागदपत्रावरुन कर्जाला व्याजदर १५% ठरला आहे हे सिध्द होत आहे. म. स. का. कलम ९६ सांगते की व्याज दर हा करारात नमुद व्याजदर प्रमाणे देणे बंधनकारक आहे. तेव्हा कलम ९६ च्या तरतुदीनुसार वादी हे पुढील व्याज १५% प्रमाणे आकारण्यास पात्र आहेत. तेवहा मी या निष्कर्षास येत आहे की, वादी हे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या कडुन रक्कम रु. १०,०२,६१४/– वैयक्तिक व संयुक्तिरित्या पुढील व्याज १५% प्रमाणे वसुल करण्यास पात्र आहे. या सर्व कारणावरुन माझे या मुद्दयास उत्तर होकारार्थी आहे.

<u>मुद्दा क्र. ०४ :–</u>

३५. प्रतिवादी क्र.०१ यांनी आपल्या कैफियतीद्वारे असे कथन केले आहे की, कर्जाची मुदत ही तीन वर्ष आहे असे वादीने आपल्या दाव्यात व जवाबात सांगितले आहे. परंतु या परतफेडीच्या कालावधीमध्ये दाखल केलेल्या कर्जकागदपत्र बघितले असता त्यामध्ये विसंगती दिसुन येत आहे. प्रतिवादी चे असे म्हणणे आहे की, कर्ज अर्जामध्ये कर्जाचा कालावधी पाच वर्ष लिहिलेला आहे, कर्जरोख्यामध्ये कालावधी लिहिलेला नाही व कर्जखातेउताऱ्यात कर्जाचा कालावधी हा १० वर्ष दाखविला आहे. प्रतिवादी क्र.०१ यांचे असेही कथन आहे की,कर्जाची मुदत जेव्हा तीन वर्ष होती तेव्हा वादी संस्थेने कर्ज

कालावधी संपताच दावा दाखल करण्याचा होता. परंतु वादी संस्थेने सन २०२४ पर्यंत कुठलीही वसुलीची कारवाई कली नाही व येणे रक्कम कर्जाच्या पाच पट केली आहे. प्रतिवादी क्र.०१ यांचे असे म्हणणे आहे की, वादी संस्था रॉग डोअर आहे व रॉग डोअर यांना इक्वीटेबल राईट चा मागणी करता येणार नाही व डिले डिफॉल्ट इक्वीटी या तत्वांचा बाधा निर्माण झालेला आहे. तेव्हा प्रतिवादी क्र.०१ यांचे असे कथन आहे की, वादी संस्थेला फक्त दाम दुप्पट प्रमाणे व्याजाची वसुली करण्याचा अधिकार आहे.

३६. प्रतिवादी क्र.०१ च्या विद्वान वकिलांचा युक्तिवाद व त्यांनी सादर केलेल्या लेखी युक्तिवादाचे अवलोकन केले असता ते असे सांगतात आहे की, वादी संस्थेने सन–२०१५ पासुन या प्रतिवादींनी कर्जखात्यात एकही रक्कम भरली नसतांना प्रतिवादी विरुध्द वसुलीची कोणतीही कार्यवाही केली नाही. तसेच या विलंबासाठी वादी संस्थेने आपल्या दाव्यात स्पष्टीकरणही केले नाही. वादी संस्थेने खातेउताऱ्यात रक्कम रु. १०,००,०००/– व अधिक रकमेची मागणी केली आहे. त्यांचा असा युक्तिवाद आहे की, १० वर्षात कर्जाची येणे पाचपट केली आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, वादी यांना दामदुप्पटीच्या तत्वाप्रमाणे कर्जाची रक्कम दामदुप्पटी पेक्षा अधिक मागण्याचा अधिकार नाही. तेव्हा वादी हे प्रतिवादींकडुन दामदुप्पट पेक्षा जास्त रक्कम वसुल करु शकत नाही.

या अनुषंगाने मी म. स. का. कलम ४४ (अ) चे अवलोकन केले आहे.

''कलम ४४अ – कोणत्याही करारात किंवा सध्या आमलात असलेला कोणत्याही कायदयात काहीही अंतर्भुत असले तरी, कोणतीही संस्था (सहकारी बँक आणिसहकारी कृषी व ग्रामीण बहुउद्देशीय विकास बँकसह) तिच्या द्वारे कोणत्याही सभासदाला १५ वर्षापेक्षा जास्त नसलेल्या कालावधीसाठी दिलेल्या कोणत्याही कर्जासाठी (पुर्नवसन कर्जसह, परंतु सिंचन किंवा कृषी विकासाच्या उद्देशासाठीचे दिर्घ कालीन कर्ज किंवा {दहा हजार रुपयांपेक्षा जास्त }) गैरकृषी किंवा व्यवसायिक उद्देशासाठी कर्ज देऊ शकणार नाही, मग ते कर्ज अधिनियमाच्यया प्रांरभापुर्वी दिले गेले असो किंवा नंतर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९८५ अन्वये, कोणत्याही प्रकारे व्याजापोटी कर्जाच्या मुद्दलापेक्षा जास्त रक्कम वसुल करु नयेत.''

३७. या तरतुदी प्रमाणे जर एखाद्या सहकारी संस्थेने, सहकारी बँक तसेच

बहुउद्देशीय बँक जर तिच्या सभासदाला दहा हजाराच्या आत कर्ज दिले असेल, परंतु ते कर्ज सिंचन किंवा कृषी विकासाठी असलेले दिर्घकालीन कर्ज नसेल, किंवा दहा हजाराच्या आत असलेले व्यवसायिक कर्ज असेल तर त्या कर्जांना मुद्दल रकमापेक्षा जास्त व्याज आकारता येणार नाहीत.

३८. आता वादातील कर्ज बघता ते दहा हजारापेक्षा जास्त रकमेचे आहे. तसेच ते कर्ज सिंचन अथवा कृषी विकासासाठीचे कर्ज नाही. तेव्हा माझे असे मत आहे की, वादातील कर्जाला दाम दुप्पटीच्या नियम लागु होणार नाही, कारण वादातील कर्ज हे व्यवसायिक कर्ज असुन ते दहा हजार रुपयापेक्षा जास्त रकमेचे आहे. तेव्हा प्रतिवादी क्र.०१ यांची त्यांच्या कर्जाला दामदुप्पटीचा नियम लागु करण्याची विनंती कायद्यास धरुन नाही व ती मान्य करता येणार नाही. तेव्हा माझे या मुद्यास उत्तर नकारार्थी असे आहे.

<u>मुद्दा क्र. ०५ :–</u>

३९. उपरोक्त मुद्दयांना दिलेल्या कारणमिमांसा प्रमाणे, मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

<u>आदेश</u>

१) वादी यांचा दावा खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी क्रमांक ०१ ते ०३ यांनी वादी संस्थेला रु. १०,०२,६१४/– संयुक्तपणे व वैयक्तिरित्या देण्याचे आहे. तसेच रक्कम रु. २,००,०००/– वर दि. ०१/०७/२०२४ पासून पुढील व्याज १५% साध्या व्याज दराने संपुर्ण रक्कम फिटे पर्यंत देण्याचे आहे.

३) प्रतिवादी ०१ ते ०३ यांनी वादी यांना दाव्याचा खर्चही देण्याचे आहे.

४) येणेप्रमाणे निवाडा तयार करण्यात यावा.

DANDGE RAJU NARAYAN
Digitally signed by DANDGE RAJU NARAYAN
Date: 2026.08.06 15:55:22 +0530

दिनांक : ०६/०८/२०२६
ठिकाण : कोपरगाव

आर. एन. दांडगे
न्यायाधीश
सहकारी न्यायालय, कोपरगाव